**नगर परिषद मलकापूर जि.बुलढाणा**

**दि.4/05/2022 प्रशासकीय स्थायी सभेचे कार्यवृत्त**

**1.सन 2020-21 चे द्विनोंद पध्दतीने लेखे तयार करण्याकरिता आलेल्या निविदांना मान्यता देणे.**

नगर परिषद सर्व साधारण सभा ठराव क्रं.13दि.24/6/2021नुसार सन 2020-21 चे द्विनोंद पध्दतीने लेखे तयार करण्यास व येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान केली असून त्यानुसार दै.देशोन्नती वर्तमानपत्र दि.31/3/2022 मध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार खालील प्रमाणे निविदाधारक व दर प्राप्त झाले.

| अ.क्रं. | निविदाधारक | दर (प्रतिवर्ष) |
|---|---|---|
| 1 | प्रतिम सुतार& असो | रु.3,75,000/- |
| 2 | शक्ती पवार &असो | रु.3,90,000/- |
| 3 | कल्याण जगताप & असो | रु.3,95,000/- |

वरील निविदा मध्ये सर्वात कमी दर प्रतिम सुतार& असो याचे आहे.असे लेखापाल मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत नमूद करण्यात आले आहे.

ठरविण्यात येते की, वरील सर्व बाबी विचारात घेवून सन 2020-21नगर परिषदचे द्विनोंद पध्दतीने लेखे तयार करण्याकरिता आलेल्या सर्वात कमी दराच्या प्रतिम सुतार & असो यांचे रु.3,75,000/-निविदेस व सदरचा खर्च न.प.निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**2.वर्ष2022-23 मध्ये संगणक विभाग नगर परिषद कार्यालय,मलकापूर करिता संगणक देखभाल व दुरुस्ती व नविन साहित्य करिता आलेल्या वार्षीक दर ला मंजूरी देणेबाबत.**

मलकापूर नगर परिषद मध्ये विविध विभागा अंतर्गत त्यामध्ये जन्म-मृत्यू,मालमत्ता कर व पाणी कर,लेखा विभाग,सामान्य प्रशासन,आस्थापना,आरोग्य,बांधकाम,नियोजन विभाग,सभा कामकाज विभाग,पाणी पुरवठा विभाग,विदयुत विभाग,नागरी उपजीविका अभियान इत्यादी विभागामध्ये संगणक वर सेवा तसेच दैनंदिन कामकाज करण्यात येते त्यामुळे नमूद सर्व विभागात संगणक,प्रिंटर,इंटरनेट व त्यासंबंधी इतर बाबी वर्षभर पुरवाव्या लागतात.

तसेच बरेच वेळेस सण,उत्सव,जयंती किंवा इतर विशिष्ट परिस्थितीत काही वेळेस सी.सी.टी.व्ही संवदेनशील ठिकाणी बसविणे बावत पोलीस स्टेशन,तहसील कार्यालय किंवा वरिष्ठ कार्यालय यांचे कडून सांगण्यात येते.अश्या प्रकारे कार्यालयीन कामकाज व इतर कायदा व सुव्यवस्थाशी निगडीत बाबी करिता सेवा पुरविण्यात येतात ही कामे करताना बरेच वेळेस साहित्या मध्ये अडचणी किंवा नादुरुस्त होतात.त्यामुळे त्याची दुरुस्ती व देखभाल करणे आवश्यक असते.तसेच कारटेज भरणे त्याची दुरुस्ती किंवा नविन घेणे,संगणक दुरुस्ती किंवा नविन घेणे ही कामे वारंवार गरजेनुसार करावी लागतात तसेच वर्ष 2022-23 मध्ये नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक आहेत त्यामुळे मोठया प्रमाणात साहित्याची गरज निर्माण होते जसे कि सी.सी.टी.व्ही,संगणक प्रिंटर व इतर साहित्य करिता वार्षीक दर मागविण्यास व त्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया करण्यास तसेच सदर कामे न.प.निधीतून करण्यास व येणाऱ्या खर्चास

प्रशासकीय सभा ठराव क्रं.1 दि.17/3/2022 नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दै.पुण्यनगरी दि.29/3/2022 चे वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आल्या त्यानुसार वार्षीक दर करार पध्दतीन एकुण 103बाबी करिता दर मागवून घेण्यात आलेले आहे.

सदर कामाकरिता एकुण पात्र तीन निविदाधारका कडून निविदा भरण्यात आलेली आहे त्यांची नावे व एकत्रित दर पुढील प्रमाणे आहेत अनुक्रमे.

| अ.क्रं. | निविदाधारकाचे नांव | दर |
|---|---|---|
| 1 | श्री.कॉम्प्युटर सिस्टीम | 880156/- |
| 2 | माऊली कॉम्पुटर | 969504/- |
| 3 | श्री मल्टी सर्विसेस- | 938234/- |

वरील पैकी श्री कॉम्पुटर सिस्टीम यांचे एकत्रित दर सर्वात कमी असून त्यांच्या भरलेल्या दरांस प्रशासकीय व वित्तीय मंजूर प्रदान करणे आवश्यक आहे.असे संगणक अभियंता व मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत नमूद करण्यात आले आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेता श्री कॉम्प्युटर सिस्टीम यांचे एकत्रित दर सर्वात कमी असून त्यांच्या भरलेल्या दरांस प्रशासकीय व वित्तीय मंजूर प्रदान करण्यात येत आहे.

(आर.पु.सुरडकर)
प्रशासक,
नगर परिषद,मलकापूर